ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

Marathi / English Part - VII

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING

2018 - 5.5

www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan

Aurangabad. (M.S.)

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd 1983 Purna (Jn.)

192

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# ५. कॅस लेस अर्थव्यवस्थेत ई-बँकिंगचे योगदान

**डॉ. प्रा. बि. एम. बिरादार**

सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, श्री. गुरूबुध्दी स्वामी महाविद्यालय, पुर्णा, जि. परभणी.

**सारांश**

आधुनिक काळ म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून सध्या प्रत्येक क्षेत्रात डिजीटल कार्य प्रणाली अस्तित्वात आलेली आहे. त्यामुळे सामाजिक राजकीय,आर्थिक, व्यवसायीक, कृषी, औद्योगिक, शैक्षणिक व व्यापारी क्षेत्रात डिजीटल प्रणालीचा उपयोग मोठया प्रमाणावर सुरू झालेला आहे. सदरील शोध निबंधामध्ये बँकिंग क्षेत्रातील डिजीटल प्रक्रिया म्हणजे इलेक्ट्रॉनिक बँकिंग प्रणालीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच बरोबर अर्थ विरहीत अर्थव्यवस्थेत ई–बँकिंग पध्दत व त्यांचा उपयोग, कार्य पध्दती व माध्यमावर (साधने) प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :– (Introducation)**

भारताने 1991 नंतर खुली अर्थव्यवस्थेचा स्विकार केला व त्यानंतर खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण, प्रक्रियाची सुरूवात झाली व भारतात सर्व क्षेत्रात आंतरराष्ट्रीय बहुराष्ट्रीय व जागतीक कंपन्याची शिरकाव केला. त्यात प्रामुख्याने बँक वित व विमा क्षेत्रात या कंपन्या जास्त सक्रिय झाल्या. सन 2000 मध्ये बँक व विमा व्यवसायात खाजगी कंपन्याना व्यवसायासाठी परवानगी देण्यात आली व खाजगीकरणाला मान्यता देण्यात आली. त्याचा परिणाम भारतात राष्ट्रीय बँका बरोबर विदेशी बँका देखील व्यवसाय करू लागल्या व विदेशातील डिजीटल पध्दतीचा भारतात सुरूवात झाली व विदेशी बँका बरोबरच भारतीय बँकांनी या प्रणालीचा उपयोग करण्यास सुरूवात केली. सध्या भारतातील जवळपास सर्व प्रकारच्या बँकेत डिजीटल कार्य प्रणालीचा उपयोग होत आहे. या डिजीटल कार्य प्रणालीलाच ई–बँकिंग पध्दत असे म्हणतात. ई–बँकिंग प्रणाली मानव विरहीत प्रणाली आहे.

**इलेक्ट्रॉनिक बँकिंगचा अर्थ व व्याख्या :–(Meaning & Definication of B- Electric Banking-E-Banking)**

ई–बँकिंगचा सर्व समावेशक अर्थ म्हणजे संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे बँकेतील सर्व कार्य करणे होय. याचाच अर्थ माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा बँकेच्या व्यवहारात संगणकाच्या व इंटरनेट साहयाने उपयोग करून बँकेच्या ग्राहकाना बँकेच्या सर्व सेवा पुरवणे म्हणजेच ई–बँकिंग क्षेत्रात देखील डिजीटल कार्यपध्दती अस्तित्वात आलेली आहे. परिणामी बँकिंग क्षेत्रात संगणकाचा वापर होण्यास सुरूवात झाली. त्यानुसार बँकेतील सर्व व्यवहार संगणकीकृत करून त्यात इंटरनेट, वेबसाईड हॉटसअॅप, मोबाईल वॉलेट या सर्वाचा उपयोग बँकिंग कार्यासाठी केला गेला. यालाच ई–बँकिंग(E-Banking) असे म्हटले जाते.

"ई–बँकिंग म्हणजे माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनीक टेक्नालॉजीच्या आधारावर बँकेचे संपुर्ण व्यवहार संपन्न करणे होय."

"मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकाच्या साहयाने व इंटरनेट आणि मोबाईलसच्या माध्यमाद्वारे बँकेतील सर्व कार्य करणे व ग्राहकांना संगणकीय प्रणालीद्वारे बँकिंग सेवा प्रदान करणे म्हणजेच ई–बँकिंग आहे."

**ई–बँकिंगच्या सेवा :– (Service of E-Banking)**



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ई बँकिंगच्या मार्फत बँकेच्या ग्राहकाना अनेक प्रकारच्या सेवा व सोई दिल्या जातात. त्या सेवा ग्राहकाला वारंवार बँकेत न जाता इंटरनेट व मोबाईल्स द्वारे प्राप्त होत असतात. त्यात प्रामुख्याने पुढील सेवाचा समावेश होतो.

**1) इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवा :-(Electronic Clearing Service)** या पध्दतीत सर्व देवाण–घेवाण पध्दतीत क्रांतीकारी बदल झालेला आहे. कारण या पध्दतीत सर्व पैशाचे देवाण घेवाण स्वयंचलित असून यात मानवी हस्तक्षेप नसतो. या व्यवस्थेत ग्राहक हा कोणत्याही एका शाखेचा ग्राहक न राहता तो बँकेचा ग्राहक होतो. कारण इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवेत केंद्रिकृत लेखांकन ग्राहक माहिती व देवाण–घेवाण संबंधीची कार्यवाहीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. हि सर्व व्यवस्था माहिती व तंत्रज्ञानावर आधारित आहे. कोअर बँकींगने कुठेही ही संकल्पना साकार केली आहे. या प्रणाली मुळे घरी बसल्या जागी मोबाईल वरून बँकेतील व्यवहाराची माहिती ग्राहकाना प्राप्त होते. तसेच बँक सेवेचा लाभ घेता येतो.

**2) स्वयंचलित चलन यंत्र (Automated Teller machines ATM)**

या स्वयंचलित चलन अदान–प्रदान यंत्र (ATM) हे प्राुख्याने चलन (पैसे) मोजण्याचे व देण्याचे आणि स्विकारण्याचे स्वयंचलीत यंत्र आहे. 1997 मध्ये ATM नेटवर्कसाठी ए.शेयर्ड पेमेंट नेटवर्क सिस्टीम,मुंबई मध्ये सुरू करण्यात आली. बँकेचे ग्राहक केव्हाही (24तास) ATM कार्ड यंत्रात घालून पैसे काढू शकतात. त्यासाठी ATM मध्ये कार्ड घातल्यानंतर संगणकाद्वारे ग्राहकाची ओळख (पासवर्ड) मागीतले जाते व ओळखीची खात्री झाल्यानंतर पुढील व्यवयहार पुर्ण करून ग्राहकाला रक्कम देण्यात येते आणि खात्याच्या एकुण तपशिलाबाबत प्रिन्ट कागदावर बाहेर येते.

ATM इंटर बँकिंग नेटवर्कशी जोडलेले असल्यामुळे कोणत्याही बँकेच्या ATM चा वापर करून आपल्या खात्यातून रक्कम काढता येते व रक्कम जमा करता येते.

**3) नावे पत्र :-(Debit Card)** प्रत्यक्ष रोख, रक्कमेशिवाय खरेदीचे व्यवहार किंवा सेवा प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणारे पत्रास नावे (Debit Card) असे म्हणतात. नावे पत्राचा संबंध हा नावे पत्र धारक व्यक्तीच्या खात्याशी असतो. आपल्या खात्यात रोकड शिल्लक किती आहे. याची तपाणी करावी लागते. कार्ड धारकाच्या खात्यात रक्कम शिल्लक असेल तरच आर्थिक व्यवहार करता येतात.अन्यथा आर्थिक व्यवहार करता येत नाहीत.

**4) उधार पत्र :-(Credit Card)** भारतात सर्व प्रथम 1961 मध्ये डिनर क्लॅब ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने उधार कार्ड योजना सुरू केली. त्यानंतर 1980मध्ये राष्ट्रीयकृत बँक सेंट्रल बँक ऑफ इंडियाने उधार पत्र देण्यास सुरुवात केले. भारतातील उधार पत्राची नावे सर्व साधारणपणे इंडिया कार्ड, बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रीनकार्ड, कॅनरा बँक, बॉब कार्ड, बँक ऑफ बडोदा, सेन्ट्रल कार्ड व रूपये कार्ड आहेत. उधार पत्र हे प्लॅस्टिक पत्र असते. त्यामुळे त्याला प्लॅस्टिक चलनाच्या स्वरूपात वापरले जाते. जेव्हा बँका ग्राहकाना उधार पत्र प्रदान करतात तेव्हाच उधार पत्र धारक व्यक्तीला रोख रक्कम, वस्तु व सेवा उधारीवर प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

जी बँक उधार पत्र निर्माण करते तीच बँक आपल्या उधार पत्र धारण करणाऱ्या ग्राहकांना उधारीवर खरेदी केलेल्या व्यवहाराचा तपसील पाठवतो आणि त्या कार्ड धारकाने तेवढी रक्कम ठरवून दिलेल्या कालावधीत खात्यावर जमा करावी अन्यथा त्या रक्कमेवर व्याज आकारले जाते.

**5) स्मार्ट कार्ड :-(Smart Cards)** ATM कार्ड, क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड या सर्वांचा उपयोग एकाच कार्डाद्वारे केला जातो. त्या कार्डास स्मार्ट कार्ड असे म्हणतात. एकच स्मार्ट कार्ड हे ATM कार्ड, क्रेडिट कार्ड व



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd.1983 Purna (Jn.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

डेबीट कार्ड असा प्रकारचे कार्य केले जाते म्हणजेच बहुउपयोगी कार्ड असते. थोडक्यात अनेक प्रकारचे उपयोग करण्यासाठी स्मार्ट कार्ड उपयोगी पडते.

स्मार्ट कार्ड मध्ये एक विशिष्ट धातुची चिप असते. या चिप मध्ये विशिष्ट माहिती साठवून ठेवण्याची सुविधा असते. या चिप मध्ये एकदा साठवलेली माहिती बदलता किंवा पुसता येत नाही. स्मार्ट कार्ड असल्यास विविध प्रकारचे कार्ड वापरण्याची गरज नसते.

**6) निधीची बदली करणे :–(Electronic Fund Transfer-EFT)** ऋण विद्युत कणाच्या साहायाने निधीची बदली करणे म्हणजेच इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर ही संपुर्ण प्रणाली संगणकाद्वारे केली जाते. त्याचा उपयोग वित्तीय देवाण घेवाण करण्यासाठी केला जातो. त्याच प्रमाणे यावरिल व्यवहार रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाच्या आदेशानुसार करण्यात येतात. नागरिकामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी (NEFT) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर,(ECS) इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, इ.उपयोग केला जातो. EFT हे यंत्र याद्वारे निधीची देवाण घेवाण करण्यासाठी प्रत्यक्ष रोख रक्कमेचा वापर न करता कागदाची बचत केली जाते.

EFT मुळे ग्राहकाच्या वेळेची बचत होते. तसेच या पध्दतीत एकदा पैसे भरल्यानंतर परत मिळत नाहीत. परंतु विशिष्ट प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास दिलेल्या तारखेपासून फक्त तिन महिन्यापर्यंतच पैसे परत मिळतात. त्यानंतर मात्र पैसे परत मिळत नाहीत.

**निष्कर्ष**

भारतात खऱ्या अर्थाने 8 नोंव्हेबर 2016 रोजी नोटबंदी करण्यात आली व चलनातून 1000 व 500रूपयाच्या नोटा बंद करण्यात आल्या. त्याचा परिणाम आर्थिक व्यवहारावर झाला व देशात आर्थिक अडचण निर्माण झाली व तेव्हापासून कॅश लेस अर्थव्यवस्थेकडे सत्कार व सामान्य नागरिकांचाकल निर्माण झाला. सध्या कॅश लेस अर्थ व्यवस्थेकडे जास्तीक जास्त लक्ष देण्यात आले आहे व त्यासाठी कॅश लेस अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी नवनवीन माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग होत आहे. व या कॅश लेस अर्थव्यवस्थमध्ये ई–बॅकिंग प्रणालीचा सर्वात मोठे योगदान आहे. कारण बॅकांचा संबंध सर्व सामान्य जनतेसी येतो व या ई–बॅकिंग प्रणालीमुळे कॅश लेस अर्थव्यवस्था निर्माण करणे सोईचे व सोपे होते.

**संदर्भ**

1. योजना मासिक – डिसेंबर 2018, डिसेंबर 2017.
2. भारतीय बॅकिंग आणि वित प्रणाली – डॉ. कुणाल बडदे
3. भारतीय अर्थव्यवस्था – प्रतियोगिता दर्पण 2015–16.
4. अधिकोष आणि नाणेबाजार – डॉ. एस.एस.देशपांडे
5. भारतीय बॅकिंग – प्रा.भोसले आणि कांटे
6. भारत में मुद्रा एंव बॅकिंग प्रणाली – राहुल गोस्वामी
7. भारतीय अर्थ व्यवस्था – डॉ.जी.एन.झामरे
8. कॅसलेस – प्रणव सखदेव
9. नोटबंदी – राम जगताप

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani